आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२१ फेब्रुवारी २०२५ शुक्रवार

**ठळक बातम्या**

- ९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन /मराठी भाषेनं समाजातल्या शोषित, वंचित वर्गासाठी सामाजिक मुक्तीचं द्वार उघडल्याचे प्रधानमंत्र्यांचे गौरवोद्गार
- भाषा ही जोडणारी हवी, तोडणारी नाही, अशी संमेलनाध्यक्ष तारा भवाळकर यांची स्पष्टोक्ती
- छत्रपती संभाजी महाराजांविषयी आक्षेपार्ह मजकूर न हटवल्याबद्दल विकिपीडियाच्या चार संपादकांविरुद्ध सायबर विभागाकडून गुन्हा दाखल

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत विदर्भ आणि केरळनं पटकावलं अंतिम सामन्यात स्थान

**<><><><><>**

मराठी भाषेनं समाजातल्या शोषित, वंचित वर्गासाठी सामाजिक मुक्तीचं द्वार उघडलं असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्लीत केलं. ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं त्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. ज्ञानबा तुकारामांच्या मराठीला राजधाधी दिल्ली मनापासून अभिवादन करते, असं ते म्हणाले.

यावेळी अनेक मराठी साहितियक, समाज सुधारक, मराठी साहित्य यांचा उल्लेख केला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देता आला हे सौभाग्य असल्याचं ते म्हणाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघामुळं मराठी भाषा आणि परंपरेशी संबंध आला. त्यामुळं मराठी बोलण्याचा प्रयत्न, मराठीचे नवीन

शब्द शिकण्याचा प्रयत्न आपण नेहमीचं केला असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

भाषा ही संस्कृतीची संवाहक आहे. त्या समाज निर्माणात महत्त्वाची भूमिका बजावतात असंही प्रधानमंत्री म्हणाले. १०० व्या साहित्य संमेलनच्या तयारीला आतापासून लागण्याचं आवाहन त्यांनी केलं. त्यात अधिकाधिक युवकांना सामावून घ्या,अधिकाधिक लोकांना मराठी शिकवण्यासाठी प्रयत्न करा अशा सूचना त्यांनी केल्या.

अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर पहिलं संमेलन दिल्लीत होतंय ही अभिमानाची गोष्ट असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस म्हणाले. मराठी लोकभाषा झाल्यानं ती समृद्ध झाल्याचं त्यांनी सांगितलं. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल स्वागताध्यक्ष शरद पवार यांनी प्रधानमंत्र्यांचे आभार मानले. संमेलनाला महिला अध्यक्ष मिळाल्याबद्दल पवार यांनी तारा भवाळकर आणि साहित्य महामंडळाचं अभिनंदन केलं. राजकारण्यांनी साहित्य संमेलनाच्या मंचावर येऊ नये, असं मत त्यांनी व्यक्त केलं. यावरुन दरवर्षी वाद होतो असं म्हणत त्यांनी विधीमंडळात आलेल्या विविध साहित्यिकांची उदाहरणं दिली आणि याविषयावरुन वाद नको असं आवाहन केलं.

संमेलनाध्यक्ष तारा भवाळकर यांनी छोटेखानी भाषणात भाषा ही जोडणारी हवी, तोडणारी नाही, असं मत व्यक्त केलं.

भाषा ही जैविक गोष्ट आहे, ती बोलली तर जिवंत राहते, असं त्या म्हणाल्या. साहित्य संमेलनाची अध्यक्ष महिला झाली हा मुद्दा नसून गुणवत्ता हा मुद्दा असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा उषा तांबे यांनी

प्रास्ताविक केलं आणि आयोजक संजय नहार यांनी संमेलनाच्या मागची भूमिका मांडली. काश्मिरमधली गायिका शमिमा अख्तर हिनं राज्य गीत आणि पसायदान म्हटलं.

यानंतर माजी केंद्रीय मंत्री सुशील कुमार शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दुसरे उद्घाटन सत्र होईल. त्यात गेल्या संमेलनाचे अध्यक्ष रवींद्र शोभणे आणि या संमेलनाच्या अध्यक्ष तारा भवाळकर यांचं भाषण होईल. दिल्लीतल्या तालकटोरा क्रीडा संकुलात उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरीत तीन दिवस चालणाऱ्या या संमेलनात, मान्यवरांच्या मुलाखती, बहुभाषिक कवी संमेलन, विविध विषयावर परिसंवाद, आदी कार्यक्रम होणार आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या इयत्ता दहावीच्या लेखी परीक्षेला आजपासून सुरुवात झाली. यंदा राज्यातल्या ५ हजार १३० मुख्य केंद्रावर परीक्षा होत असून १६ लाख ११ हजार ६१०विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी निर्धारित वेळेनंतर १० मिनिटे वेळ वाढवून देण्यात येणार असल्याचं मंडळानं कळवलं आहे.

दरम्यान जालना जिल्ह्यातल्या बदनापूर शहरात दहावीचा मराठी विषयाचा पेपर फुटला नसल्याचं जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र शासनाच्या  सांस्कृतिक कार्य विभागानं सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या पिंगुळी इथं तीन दिवसीय  ठाकर लोककला महोत्सव आयोजित केला आहे.

या महोत्सवाचं उदघाटन उद्या सकाळी ११.३० वाजता वाजता सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, पालकमंत्री नितेश राणे आणि खासदार नारायण राणे यांच्या उपस्थितीत होणार आहे. या महोत्सवादरम्यान राधा नृत्य, कळसुत्री बाहुल्या, चित्रकथी, पांगुळ बैल, पोवाडा, पोतराज , तारवागीत आणि डोनागीत यांसारख्या विविध ठाकर लोककला सादर केल्या जाणार आहेत. अशा प्रकारचा लोककला महोत्सव शासनानं पहिल्यांदाच आयोजित केला आहे.

<><><><><>

छत्रपती संभाजी महाराजांविषयीचा आक्षेपार्ह मजकूर न काढल्याबद्दल महाराष्ट्र सायबर विभागानं विकिपीडियाच्या चार संपादकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. विकिपीडियाचं संपादन करणाऱ्या, कॅलिफोर्निया इथल्या विकिमीडिया फाउंडेशनला नोटीस पाठवून मजकूर काढून टाकण्याची विनंती सायबर विभागानं केली होती. नोटीस पाठवूनही हा मजकूर हटवलेला नाही. अशा प्रकारचा मजकूर माहितीच्या स्रोतावर झळकत राहिला तर राज्यात तणावाचं वातावरण निर्माण होऊ शकतं, त्यामुळे गुन्हा दाखल केल्याची माहिती सायबर विभागानं दिली आहे.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत विदर्भ आणि केरळनं अंतिम सामन्यात स्थान मिळवलं आहे. नागपुरात झालेल्या उपांत्य सामन्यात विदर्भानं मुंबईवर ८० धावांनी विजय मिळवून अंतिम फेरी गाठली. विजयासाठी विदर्भानं दिलेल्या ४०६ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईचा, दुसरा डाव ३२५ धावांवर संपला. या डावात, विदर्भातर्फे हर्ष दुबेनं ५ गडी बाद केले. मुंबईनं

आपला दुसरा डाव कालच्या ३ बाद ८३ या धावसंख्येवरून पुढे सुरू केल्यानंतर शिवम दुबे, सुर्यकुमार यादव आणि आणि आकाश आनंद हे फलंदाज झटपट बाद झाले. त्यानंतर शम्स मुलानी आणि शार्दुल ठाकूर यांनी शतकी भागीदारी करत मुंबईचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. शार्दुल ठाकूर ६६, तर शम्स मुलानी ४६ धावा करून बाद झाला. पहिल्या डावात ५४ आणि दुसऱ्या डावात १५१ धावा करणारा विदर्भाचा यश राठोड सामन्यातला उत्कृष्ट खेळाडू ठरला.

अहमदाबाद इथं गुजरात आणि केरळ यांच्यात झालेल्या उपांत्य सामन्यात आज गुजरातचा पहिला डाव ४५५ धावांवर संपला. त्यामुळे या डावात केरळला २ धावांची नाममात्र पण महत्वाची आघाडी मिळाली. दुसऱ्या डावात केरळनं दिवसअखेर ४ बाद ११४ धावा केल्या. आज सामन्याचा शेवटचा दिवस असल्यानं सामना अनिर्णित राहिला. मात्र पहिल्या डावातल्या आघाडीच्या जोरावर केरळनं अंतिम सामन्यात स्थान निश्चित केलं. पहिल्या डावात नाबाद १७७ धावा करणारा केरळचा महंमद अजहरुद्दीन सामन्यातला उत्कृष्ट खेळाडू ठरला.

विजेतेपदासाठीची अंतिम लढत येत्या २६ तारखेला सुरू होईल.

**<><><><><>**

महिला प्रिमीअर लिग क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळूरूचा सामना मुंबई इंडियन्ससोबत होणार आहे. चेन्नई इथं संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरू होईल.

या स्पर्धेत बंगळुरूनं या आधी झालेले आपले दोन्ही सामने जिंकले आहेत. मुंबईनं दोनपैकी एक सामना जिंकला, तर एका सामन्यात त्यांना पराभव पत्करावा लागला.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात,मध्य महाराष्ट्रात आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली आहे. राज्यात सर्वात कमी किमान तापमान जळगाव येथे १२ अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**